**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** **दि. २८/१०/२०२३**

**मुंबईमध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाईत एकूण ०४ आरोपींविरुध्द कारवाई करत ६९ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे अंमली पदार्थ जप्त.**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) गु.र.क्र. ८९/२०२३ कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५<br>२) गु.र.क्र. ९०/२०२३, कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ |
| **दाखल दिनांक** | दिनांक २८/१०/२०२३ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) कुरेशी नगर, कुर्ला (पुर्व) मुंबई. व नुरबाग जंक्शन, डोंगरी मुंबई.<br>२) मस्जिद बंदर, मुंबई |
| **आरोपी संख्या** | एकूण ०४ आरोपी |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | २५८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) व एक ॲक्टीव्हा मो.सा. अंदाजे किं. रु ५२ लाखापेक्षा अधिक व ८५ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) अंदाजे किं.रु.१७ लाखापेक्षा अधिक.<br>**अशा प्रकारे एकूण ३४३ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) किं.अं. ६९ लाख रू. लाखापेक्षा अधिक चा अंमली पदार्थ.** |

(१) **२५८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन)** - गुन्हे शाखेतील अं.प.वि.कक्षाचे **आझाद मैदान युनिटचे** पथकाने दिनांक २७/१०/२०२३ रोजी कुरेशी नगर कुर्ला पुर्व मुंबई परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई करताना एक इसम एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थासह मिळुन आला त्याचेकडे मिळुन आलेल्या एम.डी. (मेफेड्रॉन) बाबत तपास करता त्याने त्याचेकडील एम.डी. डोंगरी मुंबई परीसरातुन घेतला असल्याचे सांगितल्यावरुन नुरबाग जंक्शन डोंगरी, मुंबई परीसरात तपास करता दुसरा इसम हा देखील एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थासह मिळुन आला. दोन्ही इसम त्यांचे ताब्यातून एकूण २५८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) व एक ॲक्टीव्हा स्कुटी एकुन किं.अं. रु. ५२ लाखापेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ मिळुन आल्याने, त्यांचे विरुद्ध अं.प.वि.कक्ष आझादमैदान युनिटने ८९/२०२३ कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन दोन्ही आरोपींना सदर गुन्हयांत अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेविरुध्द एन.डी.पी.एस. व इतर कायद्यान्वये विवीध पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

(२) **८५ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन)** - गुन्हे शाखेतील अं.प.वि.कक्षाचे **कांदिवली युनिटने** दिनांक २८/१०/२०२३ रोजी मस्जिद बंदर, मुंबई परिसरात छापा टाकत २ इसमाविरुध्द कारवाई करत त्याचे ताब्यातून ८५ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) अंदाजे एकूण किं.रु. १७ लाखापेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करून त्याचे विरुद्ध अं.प.वि.कक्ष कांदिवली युनिट गु.र.क्र. ९०/२०२३ कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी. पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये दाखल करण्यात आला असुन, त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अशा प्रकारे गुन्हे शाखेतील अं.प.वि.कक्षाने मुंबई शहरामध्ये विविध ठिकाणी अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत छापे टाकत एकूण ०४ अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांना अटक करून त्यांचेविरुध्द गुन्हे दाखल केले असून, त्यांचे ताब्यातून एकूण ३४३ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) अंदाजे किंमत रुपये ६९ लाखापेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२३ मध्ये एकूण ९० गुन्हे दाखल करत त्यामध्ये एकूण १८० अंमली पदार्थ तस्करांना अटक केली असून, त्यांचे ताब्यातून एकूण ४० कोटीपेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे. एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यां विरुध्द ६० गुन्हे दाखल करत एकूण १२१ आरोपींविरुध्द कारवाई केली असून, त्यांचे ताब्यातून अंदाजे २८ कोटी रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. प्रकाश जाधव, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. काशिनाथ चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत आझाद मैदान युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. राजेंद्र दहिफळे, व कांदिवली युनिटचे प्रभारी पो. नि. श्री. बेले यांचे नेतृत्वात केली आहे.

--------oo--------




